2018 - 2019

IMPACT FACTOR 4.75

ISSN 2250-169X

*International Registered & Recognized*

*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# VISION RESEARCH REVIEW

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue - XV, Vol. - I**

**Year-VIII, Bi-Annual (Half Yearly)**

**(June 2018 To Nov. 2018)**

**Editorial Office :**

'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 -241913**

9423346913 / 7276301000
9637935252 / 9503814000

**E-mail :**

interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@ gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published By :**

**Jyotichandra Publication**

Latur, Dist. Latur - 413531. (M.S.)

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**SPECIAL EDITOR**

**Dr. E. Sivanagi Reddy**
'Sthapathi'
Dept of Archaeology & Museums,
Hyderabad (A.P.)

**EXECUTIVE EDITORS**

**Michael Strayss,**
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

**Verena Blechinger Talcott**
Director, Dept. of History
& Cultural Studies, University of Barlin.
Barlin. (Jermany)

**Dr. Raja Reddy**
Formar, Director, N.I.M.S.
Hyderabad (A.P.)&
World Famous Neurosurgeon

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

**Dr. Arjun Jadhav**
Dept. of Egnlish,
Furgusion College,
Pune, Dist. Pune

**Dr. Sarjerao Shinde**
Principal,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur (M.S)

**DEPUTY EDITORS**

**Dr. Ashok G. Chaskar**
Head, Dept. of Egnlish,
S.P. College, Pune &
Dean, Faculty of Arts & Fine Arts, University of
Pune, Dist. Pune.

**Dr. M. Veeraprasad**
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, Dist. Anantpur (A.P.)

**Prof. Shrikant A. Jewale**
Dept. of Geography,
Granin Mahavidyalaya,
Vasantnagar, Dist. Nanded (MS)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

**Dr. Dr. Mahadeo S. Kamble**
Dept. of History
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

**Prashant B. Kshirasagar**
Dept. of Marathi,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

**CO - EDITORS**

**Dr. Allabaksha Jamadar**
Chairman, BOS, Hindi, SRTMUN &
Head, Dept. of Hindi,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur (M.S.)

**Dr. Murlidhar Lahade**
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed.(M.S.)

**Dr. S.B. Wadekar**
Sharadchandra Arts, Com., & Sci. College,
Naigaon (Bz), Dist. Nanded. (M.S.)

**Dr. Shivaji Vaidhya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani, Dist. Parbhani (M.S.)

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 4.75
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | A Study of HR Management Practices in Co-Operative and Private Sugar Industries In Maharashtra Region and Western Maharashtra<br>**Amar Annarao Gadade, Dr. R. D. Gaikwad** | 1 |
| 2 | The Theme of Indianness in Jejuri by Arun Kolatkar<br>**Dr. R.E. Solunke** | 9 |
| 3 | Manjukapur's feminist stance in the portrayal of Man-Woman Relationship in Her Novels<br>**Geeta V. Waghmare** | 16 |
| 4 | Mother-Daughter Relationship In Modern Kannada Poetry<br>**R. S. Dokade** | 20 |
| 5 | लातूर जिल्हयातील साखर कारखान्यांचा अभ्यास<br>**प्रा. आर. के. खोकले** | 30 |
| 6 | आदिवासी व गैरआदिवासी विद्यार्थ्यांच्या सामाजिक समायोजनाचे चिकित्सक अध्ययन<br>**डॉ.आर.एल.निकोसे, विनोद वा. गेडाम** | 38 |
| 7 | नक्षलवाद निर्मूलनातील महाराष्ट्र शासनाची भूमिका<br>**डॉ. हनुमंत भुमकर** | 46 |
| 8 | शेतकरी राजा कविता संग्रहातील शेतकरी जाणीवेची कविता<br>**डॉ. उन्मेष शेकडे** | 56 |
| 9 | अनुसूचित जातीच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**डॉ. डी. एम. दामावले** | 60 |

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 4.75
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018 46

7

# नक्षलवाद निर्मूलनातील महाराष्ट्र शासनाची भूमिका

डॉ. हनुमंत भुमकर
राज्यशास्त्र विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, जि. बीड

## Research Paper - Political Science

सामाजिक विषमता, पिळवणूक, भौगोलिकदृष्ट्या लाभलेले एकाकीपण, जमीन सुधारणांचा व रोजगाराचा अभाव ही नक्षलवादाच्या भारतातील प्रभावामागची डॉ. मनमोहन सिंग यांनी केलेली कारणमीमांसा. भारतीय राज्यांतील कमी अधिक प्रमाणात असलेल्या राजकीय, सामाजिक व आर्थिक असमतोलाचा परिणाम म्हणून २२३ जिल्हे आज नक्षली हिंसाचाराने त्रस्त आहेत[१]. दारिद्रय, बेरोजगारी, शैक्षणिक मागासलेपण यांसारख्या सामाजिक समस्या, विविध प्रकल्पांमुळे उभे राहिलेले विस्थापनाचे प्रश्न, जंगल - जमीन यांसारख्या संसाधनांपासून कायदयाच्या बडग्याने दूर केले गेलेले आदिवासी, जमीनदार - भांडवलदार यांच्याकडून मार्क्सवादाच्या धरतीवर भरडले गेलेले शेतकरी आणि कामगार या व अशा उपेक्षीत घटकांना कधी स्वयंस्फूर्तीने तर कधी राजकीय महत्वाकांक्षांवर देण्यात आलेल्या सहानुभूतीच्या मुलाम्यावर ही चळवळ संपूर्ण भारतभर विस्तारत गेली.

महाराष्ट्राच्या सीमावर्ती आदिवासीबहूल भागातच नक्षल्यांचा मुख्य रोख आहे. गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया व नांदेड या जिल्हयांत नक्षलवादयांची केंद्रे असली तरी आजकाल पुणे - मुंबई यांसारख्या विकासप्रणीत शहरांकडेही नक्षली आपली पावले वळवत असल्याचे पोलिसी सुत्रांकडून समजते.

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 4.75
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018 

(ग्रहमंत्रालयाच्या २०१० - २०११ च्या अहवालातील दिलेला तक्ता)

| राज्य | २००४ | २००५ | २००६ | २००७ | २००८ | २००९ | २०१० | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ३१० | ५३५ | १८३ | १३८ | ९२ | ६६ | १०० | ०५ |
| बिहार | ३२३ | १८६ | १०७ | १३५ | १६४ | २३२ | ३०७ | ६० |
| छत्तीसगड | ३५२ | ३८५ | ७१५ | ५८२ | ६२० | ५२९ | ६२५ | ८५ |
| झारखंड | ३७९ | ३१२ | ३१० | ४८२ | ४८४ | ७४२ | ५०१ | ९४ |
| महाराष्ट्र ८४ | ९४ | ९८ | ९४ | ६८ | १५४ | ९४ | ११ | |
| मध्य प्रदेश | १३ | २० | ०६ | ०९ | ०७ | ०१ | ०७ | - |
| ओरिसा | ३५ | ४२ | ४४ | ६७ | १०३ | २६६ | २१८ | ३५ |
| उत्तर प्रदेश | १५ | १० | ११ | ०९ | ०४ | ०८ | ०५ | - |
| बंगाल | ११ | १४ | २३ | ३२ | ३५ | २५५ | ३५० | ४५ |
| इतर | ११ | १० | १२ | १७ | १४ | ०५ | ०४ | - |
| एकूण | १५३३ | १६०८ | १५०९ | १५६५ | १५९१ | २२५८ | २२१२ | ३३५ |

गृहमंत्रालयाच्या २०१० - २०११ च्या अहवालानुसार महाराष्ट्रात गडचिरोली जिल्हयात सर्वाधिक नक्षली कारवायांची नोंद आहे तर चंद्रपूर, भंडारा, गोंदिया व नांदेड या जिल्हयांत नक्षवादयांचे अस्तीत्व आहे.[२] मागील वीस वर्षात झालेल्या नक्षली हिंसाचारात महाराष्ट्रातील १२०० जीवांना हौतात्म्य पत्करावे लागले आहे. सिरोंचामार्गे तत्कालीन चंद्रपूर जिल्हयात १९८० च्या दशकात प्रवेशलेला नक्षलवाद पुढील दोन दशकांत महाराष्ट्रात स्थिरावला. २०१० च्या दशकात नक्षली रक्तरंजीत कारवाया व सरकारी ध्येयधोरणे - कृतीआराखडे यांचा उंदरा - मांजरांचा खेळच सुरु झाला. पुढे २००६ मध्ये एक सर्वसमावेशक नक्षलविरोधी धोरण बनविण्यात आले. या सर्वसमावेशक धोरणात केंद्र व नक्षलप्रणीत राज्ये यांच्या समन्वयाने नक्षलविरोधी अभियानाच्या यशासाठी पुरेशा भक्कम आर्थिक स्त्रोताची व्यवस्था, नक्षलप्रभावीत जिल्हयांचा समान आर्थिक व सामाजिक विकास, नक्षलविरोधी कारवायांना नियंत्रीत करण्यासाठी पुरेशा सशस्त्र दलांची व्यवस्था, या दलांचे आर्थिक व मानसिक सक्षमीकरण, नक्षल्यांच्या आर्थिक स्त्रोतांवर नियंत्रण, नक्षली विचारधारेच्या प्रसारावर व प्रचारावर नियंत्रण यांसारख्या उपाययोजनांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. महाराष्ट्राने या ध्येयधोरणांचा पाठपुरावा केला आहे व राज्यांतील हिंसाचाराच्या तुलनेत महाराष्ट्राची परिस्थिती निश्चीतच बरी आहे. नक्षल्यांनी स्वतःचे अस्तित्व दाखवून देण्यासाठी घडवलेले हत्याकांड वा राजकीय नेत्यांनी केलेल्या बेजबादार विधानांना प्रत्युत्तर म्हणून नक्षल्यांनी घडवून आणलेल्या चकमकींचे विवेचन करताना एकूण प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उभे राहतात.[३] म्हणून महाराष्ट्रातील नक्षलवादाचे आजचे एकूण स्वरुप, प्रशासकीय धोरण, पोलिसी कार्यवाही व नक्षलविरोधी योजनांना लाभलेले

यशापयश यांचा लेखाजोगा मांडणे हा या लेखामागील उद्देश आहे.

विकासात्मक व संरक्षणात्मक योजनांप्रमाणेच नक्षल्यांचे, त्यांच्या सहानुभूतीदारांचे आणि सहायकांचे मानसिक परिवर्तन होणे हे ही एक दीर्घकालीन बदल देणारे शस्त्र आहे. हा विचार करुन महाराष्ट्र शासनाने जनजागरण मेळावे, ग्रामभेट, नक्षल्यांसाठी गावबंदी यांसारख्या विविध योजना नक्षलप्रभावीत गावांत सुरु केल्या आहेत. ग्रामभेट योजनेच्या माध्यमातून गडचिरोलीतील अतीदूर्गम भागातील लोकांच्या अडचणी समजावून घेवून सोडवल्या जातात. २००५ पासून सुरु करण्यात आलेल्या या योजनेतून आजपर्यंत ४५००० पेक्षा जास्त ग्रामभेटी घेतल्या गेल्यात. नक्षल्यांना असलेला गावकऱ्यांचा पाठिंबा काढून घेण्याच्या दृष्टीने त्यांचे मानसिक परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. त्यासाठी गावातील साध्या, गरीब लोकांपुढे नक्षल्यांचा खरा चेहरा समोर आणण्यासाठी आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने २५० पेक्षा जास्त जनजागरण मेळावे घडवून आणले आहेत. एकदा नक्षल्यांची खरी भूमिका ग्रामस्थांच्या समोर आल्यावर शासनाकडून पाठिंबा देवून नक्षल्यांचा अशा गावांत प्रवेश बंद करणे हे क्रमप्राप्त होते.[४] नक्षलबंदी व ग्रामविकास या दूहेरी हेतूने शासनाने नक्षल्यांसाठी गावबंदी योजना २००३ मध्ये सुरु केली. यानुसार नक्षल्यांना गावाच्या हद्दीतच प्रवेश नाकारणाऱ्या गावांना शासनाकडून तीन लाख रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येते. आजपर्यंत गडचिरोली व गोंदिया जिल्हयांतील एकूण ६०० पेक्षा जास्त गावांनी नक्षलप्रवेश रोखण्यात यश मिळवले आहे. नक्षलवादयांचे मानसिक परिवर्तन करुन त्यांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी शासनाने आत्मसमर्पण योजना २००५ मध्ये सुरु केली. आजपर्यंत या योजनेचा लाभ घेवून ११०० पेक्षा जास्त नक्षल पूर्णवेळ, अर्धवेळ कार्यकर्त्यांना शासनाकडे समर्पण करुन हिंसात्मक मार्ग सोडला आहे.[५]

आदिवासी हा नक्षलचळवळीचा मुख्य कार्यकर्ता समजला जातो. जंगलचा खरा राजा असूनही कायदयाच्या बडग्याने त्याला स्वतःच्या घरापासून दूर करुन त्याच्यावर एक अर्थने केलेल्या अन्यायाचे परिमार्जन करण्याच्या उद्दिष्टाने आदिवासी विकासाच्या अनेक योजना बनविण्यात आल्या. नुकतेच गडचिरोली जिल्हयातील लेखामेंढा या गावापासून बांबू विक्रीचा अधिकार आदिवासी जनतेला देण्याची सुरुवात शसानाने केली आहे. देशातील ५० हजार कोटींची उलाढाल असलेली गौणवन उत्पादनाची बाजारपेठ आदिवासींच्या हाती देण्याचा सुवर्णनिर्णय माजी केंद्रीय पर्यावरण मंत्री जयराम रमेश व मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी नुकताच घेता.[६] यामुळे बांबूला गौण वन उपजाचा दर्जा देउन त्यासंबंधीचा वाहतूक परवाना सोपवण्यात आलेले लेखामेंढा हे देशातील पहिले गाव ठरले आहे. आदिवासींना यातून मिळणारा रोजगार व त्या माध्यमातून त्यांना मुख्यप्रवाहात आणण्याचा प्रयत्न असा दुहेरी विचार साधून शासनाने नक्षलचळवळीचा पायाभूत आधार असणारा आदिवासी वर्ग विकासाकडे नेण्याचा बुद्धीवादी विचार कृतीत आणून एक मैलाचा दगड गाठला आहे. याबरोबरीनेच गडचिरोली जिल्हयात अडकलेल्या सिंचन प्रकल्पांनाही परवानगी देण्याबाबत शासन विचारशील

असल्याचे समजते.

आज नक्षलवाद ही संपूर्ण भारताची डोकेदुखी झाल्याने विविध नक्षलप्रणीत राज्यांनी आपापल्या नक्षली हिंसाचाराच्या प्रमाणानुसार केंद्राच्या सहकार्याने ऑपरेशन ग्रीनहंट, ग्रे हाउंड दल, कोब्रा यांसारख्या निमलष्करी दलांची व्यवस्था केली आहे. महाराष्ट्रानेही या दृष्टीने २००६ मध्येच "स्पेशल ॲक्शन ग्रुप" (SAG) या विशेष कृती दलाची स्थापना केली आहे. ज्यामध्ये ३०० विशेष प्रशिक्षित अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या अधिकाऱ्यांना नक्षल्यांच्या कार्यपद्धतीला प्रतिकूल होईल. असे वेगळे प्रशिक्षण देण्यासाठी Unconventional Operations Training Centre (UoTC) ची स्थापना हिंगणे - नागपूर येथे उभारण्यात आले आहे. तसेच या व्यतिरिक्त आवश्यकता भासल्यास केंद्राकडून वेगळी कुमक मागवण्याची सोयही करण्यात आली आहे.

१३५० कोटी रुपयांची ही पोलीस मदत योजना असून त्यातील प्रत्येकी निम्मा वाटा केंद्र व राज्य यांकडे सोपविण्यात आला आहे. नक्षल अतिसंवेदनशील भागात काम करणाऱ्या पोलिसांकडून चांगली कामगिरी व्हावी यासाठी राज्य सरकारने त्यांना २०१० मध्ये बक्षिस योजना सुरु केली आहे. गेल्यावर्षी उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या पोलिसांना ३५ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.[७]

नक्षलवादावर नियंत्रण मिळवण्यासाठी त्याचा प्रसार व प्रचार करणाऱ्या संघटनांवर नजर ठेवणे व प्रसंगी त्यांच्यावर कार्यवाही करणे हा एक महत्वपूर्ण उपाय आहे. या माध्यमातून नक्षली चळवळींना लागणारे आधारस्त्रोत पोलिसांच्या हाती लागतील व अशा नक्षलप्रणीत आघाडी संघटनांचे प्रसारकार्य व त्यातून चळवळीला लाभणारे कार्यकर्ते व उभरते नेतृत्त्व यांवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल. महाराष्ट्र शासनाने राज्यभरात पसरलेल्या रिव्होल्यूशनरी डेमोकेटीक फंट, पीपल्स डेमोकेटीक फंट ऑफ इंडिया, कबीर मंच, अखिल भारतीय समाजवाद विरोधीमंच, महाराष्ट्र जन आंदोलन, विद्रोही सांस्कृतीक मंच या व अशा एकूण ३७ नक्षलप्रणीत आघाडी संघटनांची यादीच तयार केली आहे व त्यांच्या प्रत्येक हालचालीवर पोलिस यंत्रणा लक्ष्य ठेवून आहे. नक्षलवादी विचारसरणीचा प्रभाव प्रचार रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या या निर्णयाचा व त्याच्या कडक कारवाईचा निश्चीतच फायदा होवू शकेल.

नक्षलवाद या विचारसरणीकडे ओढले जाणारे घटक मुख्यत: गरीब, आदिवासी व विकासाकडे दूर्लक्षित. या घटकांसाठी विकासात्मक पावले टाकली गेली तरच या चळवळीला भलेले मनुष्यबळ कमी होईल. कोणतीही चळवळ उभी रहाते व टिकते ती जनमानसाच्या पाठिंब्यावर. हा पाठिंबाच काढून घेणे हा या चळवळीला बसणारा मोठा धक्का ठरु शकतो. जनमानसाच्या पाठिंबा कमी करण्यासोबतच नक्षल्यांचे आर्थिक स्त्रोत शोधणे व ते नियंत्रीत करणे हा ही नक्षलवादाचा बिमोड

करण्यातील महत्वाची पायरी ठरु शकते. खनिजसंपत्तीसाठी प्रसिद्ध असलेल्या झारखंडमधील उद्योजकांकडून नक्षलवादी दरवर्षी तब्बल ३२० कोटी रुपयांची खंडणी वसूल करतात अशी धक्कादायक माहिती इंडियन डिफेनस इअरबुकमध्ये देण्यात आली आहे[८]. गृहमंत्रालयानेही या माहितीला दुजोरा देताना पुढे असे म्हंटले आहे की ही रक्कम झारखंड सरकारच्या एकूण वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यांएवढी आहे. हे लक्षात घेता, नक्षल्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत कमी झाल्यास त्यांच्या पुढील हालचालींचा वेग कमी करता येईल या विचारातून महाराष्ट्र सरकारने मुंबई, पुणे व नाशिक व या परिसरात कार्यरत असणाऱ्या व माओवाद्यांना सहायीभूत असण्याचा दाट संशय असलेल्या ५९ मुंबईस्थित बीगर शासकिय संघटनांची यादीच राज्य विभागाने तयार केली आहे व त्यांच्या हालचालींवर कडक नजर ठेवण्यात येत आहे[९].

माओवादाचे गेल्या ४० वर्षात पसरलेले लोण पहाता आजच्या तरुणांमध्ये ही विचारसरणी पसरु नये या दृष्टीने योजना राबविणे गरजेचे आहे. नक्षलवादी नेतृत्वे विविध मार्गाच्या वापरातून या विचारसरणीचे उदात्तीकरण करुन लोकांची सहानूभूती व पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. नक्षलचळवळीतील अशा महत्वपूर्ण नेतृत्वांना जेरबंद करुनही या विचारसरणीचा प्रसार व प्रचार रोखता येईल. विष्णू श्रीनिवासन या महाराष्ट्राचा स्टेट सेक्रेटरी असलेल्या व नक्षल्यांच्या पॉलिटब्युरोचाही महत्वपूर्ण मेंबर असलेल्या नक्षली नेतृत्वाला व अरुण परेरा या ए.सी.एम., कोल्डबेल्ट एरिया तसेच अॅजेलिना तेलतुंबडे, ए.सी.एम., मुंबई या तीन अतिशय महत्वपूर्ण नेतृत्वांना नक्षलविरोधी पथकाने जेरबंद केले आहे[१०].

'पोलिसपाटील' हे ग्रामीण भागातील महत्वपूर्ण पद समजले जाते. गावातील जनतेच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करण्याबरोबरच कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवून जातिय सलोखा मदत करणाऱ्या पोलिसपाटलांचा जनसंपर्क अतिशय मोठा असतो. अशा २६ पोलिसपाटीलांना 'राज्यपाल विशेष उल्लेखनीय सेवा व उल्लेखनीय शौर्य पुरस्कार' गृहमंत्री आर.आर. पाटील यांनी २०११ या वर्षापासून सुरु केले आहेत. नक्षलबाधीत जिल्हयांतील पोलिसपाटीलांना त्यांच्या चांगल्या सेवेसाठी व भविष्यकालीन चांगल्या कामगिरीसाठी, शासन कार्याला चांगले सहकार्य मिळावे या उद्देशाने गडचिरोलीतील पुरुषोत्तम उईके, चंद्रपुरातील अंतुराम वाकळे, गोंदियातील दर्याव रिनाईत आणि भंडारा येथील महादेव ढहारे या पोलिसपाटीलांची या विशेष पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.[११]

या व अशा अनेक महत्वपूर्ण यशाचे श्रेय निश्चीतपणे महाराष्ट्र नक्षलविरोधी पथकासह कार्यरत असणाऱ्या विविध दलांना देणे आवश्यक आहे. मध्ये भारतात विशेष प्रभाव निर्माण करणाऱ्या नक्षलवाद्यांच्या आक्रमणापासून महाराष्ट्राचे रक्षण गेली २५ वर्षे गडचिरोली जिल्हयातील पोलिसांनी केले. त्यासाठी त्यांच्यातील १५८ जणांना हौतात्म्य पत्करावे लागले याची जाणीव या निमित्ताने

महाराष्ट्राला होणे गरजेचे आहे.[१२]

नक्षल्यांकडे असलेली अत्याधुनिक धाटणीची शस्त्रास्त्रे ही त्यांची एक अत्यंतीक जमेची बाजू. शस्त्रास्त्रे बनविणारे स्वामालकीचे तळ, पोलिसांची शस्त्रास्त्रे लुटणे हे नक्षल्यांचे शस्त्रास्त्रांचे स्त्रोत आहेत. या स्त्रोतांवर नियंत्रण आणल्यासही ही चळवळ कोलमडून पडू शकते. महाराष्ट्र शासनाने या दृष्टीने केलेली प्रगती देखील काही अंशी नक्की समाधानकारक म्हणता येते. २००९ पर्यंत नक्षल्यांनी एके ४७, एस.एल.आर., ३०३, रिव्हॉल्वर, कट्टा यांसारखी एकूण ६६ शस्त्रास्त्रे पोलिसांकडून तर २० शस्त्रास्त्रे एकटया गडचिरोलीतील नागरिकांकडून लुटली आहेत. तर गडचिरोली जिल्हयातून ६६३ शस्त्रास्त्रे नक्षलवाद्यांकडून परत मिळवण्यात महाराष्ट्र नक्षलविरोधी पोलिसांना यश आले आहे.

पोलिसांच्या व सरकारी योजनांच्या यशाचे फलीत म्हणून आज महाराष्ट्रात काही अंशी सकारात्मक चिन्हे दिसू लागली आहेत. राज्याचे गृहमंत्री व गडचिरोलीचे पालकत्व स्विकारलेले आर.आर.पाटील यांनी या दृष्टीने गंभीर पावले उचलायला सुरुवात केली आहे. विकासकार्याला वेग दिला जात असून पोलिस यंत्रणा अधिक सक्षम व सक्रिय करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. सरकारने स्विकारलेल्या कडक धोरणांमुळे दुर्गम व कठीण भागात न जाता तिकडचे भत्ते घेणाऱ्या प्रशासकिय अधिकारी वर्गाला आता तेथे तळ ठोकून बसले आहेत.

अर्थात एवढी प्रगती म्हणजे संपूर्ण निकाल नव्हे. याआधी या संदर्भात शासनाकडून झालेले प्रयत्न कायदा व सुव्यवस्था या एकाच आधारावर केले गेल्यामुळे नक्षलवादाला काही अंशी तारकच ठरले असे खेदाचे म्हणावे लागते. संयम, सीमित शक्ती, राजकीय व प्रशासकीय उपक्रमांच्या माध्यमातून विकास, सक्षम पोलिस यंत्रणा हे देशाच्या अंतर्गत सुरक्षेचे महत्वपूर्ण घटक आहेत, ज्यांबाबत आज शासन गंभीर झालेले दिसते. अर्थात विकासाची प्रक्रिया अत्यंत सावकाश पुढे सरकत असते. बदलत्या जाणिवा व परिस्थिती यातून कधी दोन पावले पुढे तर कधी एक पाउल मागे शा पद्धतीने समस्या सोडवल्या जातात. नक्षलवाद ही राष्ट्रीय समस्या आहे. कोण्या एकाच राज्याने भरीव व परिणामकारक योजना आखून हा प्रश्न सुटणार नाही. आंध्र, ओरिसा, पं. बंगाल, छत्तीसगड, झ ारखंड या राज्यांत भयानक पिळवणूक आणि शोषण सुरु आहे. ते थांबविण्यासाठी केंद्र सरकारच्या परिणामकारक हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. राज्य सरकारे वैयक्तिक पातळीवर त्यात काही अंशी अपयशी ठरल्यानेच माओवादयांचे फावते आहे. सर्व संबंधीत राज्य सरकारांनी दीर्घकालीन परिणामकारक योजना आखून परस्पर सहकार्याने काम केले तर नक्षल्यांना पायबंद घालणे अशक्य नाही. नक्षलबाधीत राज्यांतील व केंद्रातील सत्तेचा पक्षीय फरक, नेतृत्वातील खटके, परस्पर हेवेदावे यांचे राजकारण न करता राष्ट्रापुढील या गंभीर समस्येचा सामंजस्याने व समन्वयाने विचार व्हायला हवा. सखोल विचारांतून प्रखर राजकीय इच्छाशक्तीने निश्चीत दिशेने योजनांची काटेकोर अंमलबजावणी करणे

आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने यादृष्टीने आजपर्यंत टाकलेली पावले पूर्णतः पुरेशी नसली तरी निश्चीतपणे काही अंशी समाधानकारक आहेत. केंद्र व राज्य यांच्या समन्वयाने सातत्याने असे परिणामकारक प्रयत्न गांभिर्याने केले गेल्यास व या प्रयत्नांना राजकीय इच्छाशक्ती जोड मिळाल्यास नक्षलवादाचे आव्हान पेलणे भारतासारख्या उभरत्या महासत्तेला फार अवघड नाही.

## संदर्भ सूची :-

१ दि. १७ फेब्रुवारी २००९, दै. सकाळ, पुणे आवृत्ती.
२ गृहमंत्रालयाचा २०१० - २०११ चा वार्षिक अहवाल.
३ दि. ३ फेब्रुवारी २००९, दै. सकाळ, पुणे आवृत्ती.
४ दि. २५ एप्रिल २०११, दै. सकाळ, मुंबई आवृत्ती.
५ 'Naxalism - A Growing Menace', Report by Anti - Naxal Cell, Nagpur, given to researcher dated 27th February 2008.
६ दि. २८ एप्रिल २०११, दै. लोकसत्ता, पुणे आवृत्ती.
७ दि. १ फेब्रुवारी २०१०, दै. सकाळ, पुणे आवृत्ती.
८ इंडियन डिफेन्स इयरबुक २००७ वार्षिक अहवाल.
९ दि. २८ फेब्रुवारी २००७, दै. लोकमत, नागपुर आवृत्ती.
१० दै. लोकसत्ता दि. २९ एप्रिल २०११, मुंबई आवृत्ती.
११ दै. रायगड टाईम्स, दि. २८ एप्रिल २०११, रायगड आवृत्ती.
१२ सकाळ जे जे होईल ते पहावे, हा ब्रि. श्री. हेमंत महाजन यांचा लेख, दि. ९ मे २०११, मुंबई आवृत्ती.